शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय
कर्मचारी/अधिकारी यांची पदोन्नत संवर्गात
आपापसातील ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९६/प्र.क्र ३२/९६/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- २७ मार्च, १९९७

वाचा-शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७६/१२
दिनांक:- २१ जून, १९८२.

## शासन निर्णय

शासन सेवेतील विविध संवर्गात/पदावर नियमितरित्या नियुक्ती झालेल्या शासकीय सेवकांची ज्येष्ठता त्यांच्या त्या पदावरील/संवर्गातील किंवा सेवेतील अखंडित सेवाकालावधीवरून निश्चित केली जाते. मात्र, या प्रयोजनार्थ अभावित नेमणूकीचा कालावधी वगळला जातो. म्हणजेच, ज्या दिनांकापासून संबंधितांची नियमित नेमणूक झाली असेल त्या दिनांकापासून ज्येष्ठता निर्धारित केली जाते. केंद्र शासन विरुद्ध विरपालसिंग चौहान इत्यादी [केस नं. जेटी-१९९५(७)एससी-२३१, दिनांक १०.१०.१९९५ प्रकरणी निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रातील परिच्छेद २३ मध्ये मागासवर्गीय आणि अमागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नत संवर्गात, आपापसातील ज्येष्ठता कशी निर्धारित करावी यासंबंधी नमूद केलेले तत्व खालीलप्रमाणे आहे :-

Even if a scheduled caste/scheduled Tribe candidate, is [illegible] promoted earlier by virtue of a rule of reservation/roster, than his senior general candidate and the senior general candidate is promoted later to the said higher grade, the general candidate regains his seniority over such earlier promoted Scheduled caste/Scheduled tribe candidate. The earlier promotion of the S.C./S.T. candidate in such a situation does not confer upon him seniority over the general candidate even though the general candidate is promoted later to that category.

S.O file

..p.t.o.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
- 4 APR 1997
शाखा

थोडक्यात, मागासवर्गीय सेवकाला आरक्षणानुसार अमागासवर्गीय सेवकाच्या अगोदर वरच्या पदावर जरी पदोन्नती मिळाली असली, तरी अशा परिस्थितीत त्यांच्यानंतर पदोन्नत झालेल्या सर्वसाधारण वर्गातील कर्मचा-याच्या-वर वरच्या संवर्गात ज्येष्ठता प्राप्त होत नाही.

२. सर्वोच्च न्यायालयाचा वर नमूद केलेला निर्णय व केंद्र शासनाचा कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे दिनांक ३० जानेवारी, ९७ चे आदेश लक्षात घेता राज्यशासकीय सेवेतील कर्मचा-यांच्याबाबतीत ज्येष्ठता विनियमात योग्य त्या दुरुस्त्या करणे क्रमप्राप्त ठरते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

अ] एखादया कर्मचारी/अधिका-याची आरक्षण बिंदूनुसार त्या पदावर पदोन्नतीने नियुक्ती झाल्यानंतर त्यास ज्येष्ठ असलेल्या खुल्या प्रवर्गातील कर्मचारी/अधिकारी पदोन्नत झाल्यास, तो मुळची ज्येष्ठता पुन्हा प्राप्त करील. थोडक्यात खुल्या प्रवर्गातील कर्मचारी/अधिकारी आरक्षणाच्या धोरणामुळे उशिरा पदोन्नत झाल्यास त्याच्या मूळ सेवा प्रविष्ठ संवर्गानुसार त्याची ज्येष्ठता कायम राहील.

ब] राज्यशासकीय सेवेतील वरच्या पदावर पदोन्नतीसाठी निम्न पदावर किमान सेवेची अट सेवा प्रवेश नियमात विहित करण्यात येते. वर "अ" येथे नमूद केल्यानुसार ज्येष्ठता निश्चित केल्यावर संबंधित कर्मचारी किमान सेवेची ही अट पूर्ण करीत नसतील तर त्यांचा अनुभव कालावधी तो त्यास कनिष्ठ असलेल्या मागासवर्गीयांच्या नियुक्ती दिनांकापासून धरण्यात यावा.

क] शासन सेवेतील विविध संवर्गातील निवडसूच्या वरील तरतुदीनुसार ज्येष्ठता विचारात घेऊन बनविण्यात याव्यात. सध्याच्या ज्येष्ठता यादया सुधारण्यात याव्यात.

३. ज्येष्ठता निर्धारित करण्यासंबंधीचे वरील तत्त्व शासन सेवेतील सर्व गटांतील सर्व स्तरांवरील पदोन्नत्यांच्या संदर्भात लागू राहील.

४. हे आदेश दिनांक ३० जानेवारी, १९९७ पासून अंमलात येतील.

५. सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७७/१२, दिनांक २१ जून, ८२ च्या अधिसूचनेन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा [ज्येष्ठता विनियम] नियम १९८२ मध्ये वरीलप्रमाणे आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत आहेत. त्या सुधारणा होईपर्यन्त या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ रवि भू. बुध्दिराजा ]
सचिव [सेवा]

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, [विधानसभा], मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय [विधानपरिषद], मुंबई,
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र नागपूर,
महालेखापाल-१, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक [निवासी लेखे], कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने